# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE
REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper*

₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | MARCH 2023 | No. 02


## पवित्र शास्त्र

कृपया हा शास्त्र भाग पाठ करा

स्तोत्र : ६६:१२-२०

१२) तू मनुष्यांना आमच्या डोक्यांवरुन स्वारी करावयास लाविले; आम्ही अग्नीत व पाण्यांत सांपडलो, तरी तूं आम्हांस बाहेर काढून समृद्ध स्थळी आणिले.

१३) मी होमार्पणें घेऊन तुझ्या मंदिरांत येईन, तुला केलेले नवस फेडीन,

१४) संकटांत असता ते मी आपल्या ओठांनी उच्चारिले; मी ते आपल्या तोंडानें केले.

१५) पुष्ट पशूंचे होम, मेंढ्यांच्या धूपासहित मी तुला अर्पीन; बोकडांसह मी गोव्हे अर्पीन.

१६) अहो देवाचें भय धरणारे सर्व जनहो, तुम्हा या, ऐका, त्याने माझ्या जिवासाठीं जे केले आहे ते मी सांगतो.

१७) मी आपल्या मुखानें त्याचा धावा केला, माझ्या जिव्हेवर त्याचें स्तवन होते.

१८) माझ्या मनांत दुष्कर्माचा विचार असता तर प्रभु माझे न ऐकता;

१९) पण देवाने ऐकलेच आहे; माझ्या प्रार्थनेच्या वाणीकडे त्याने लक्ष दिले आहे.

२०) देवाचा धन्यवाद होवो, त्याने माझी प्रार्थना अवमानिली नाही, आपली मजवरची दया त्याने काढून घेतली नाही

# तुमच्या दुःखाचा आनंद होईल

(योहान १६:२०)

**YOUR SORROW WILL BE TURNED INTO JOY!**

(पास्टर एस्. सॅम सेल्वा राज)

तुमचे दु:ख आनंदात बदलेल!
तुमची दु:खे आणि अश्रु निघून जातील,
मुला, खचून जाऊ नकोस, मुली खचून जाऊ नकोस.
आपला येशू तुला त्यागणार नाही.

१) भूतकाळाचा विचार कुन नाऊमेद होऊ नको,
भूतकाळात जे घडले ते विसरुन जा,
देव एक गोष्ट नवीन करणार, ती तूं आज पाहशील, आजच!
नाऊेद होऊ नको; होय, नाऊमेद होऊ नकोस,
आपला प्रभु देव तुला त्यागणार नाही.

२) देव भग्न हृदयी जनास रे करितो; इजा झालेल्यांना आधार देतो,
सर्व जखमा बाधितो, आपले अश्रु पुसतो, होय, तो आपले अश्रु पुसतो,
नाऊमे होऊ नकोस, निराश होऊ नकोस;
देव तुला त्यागणार नाही.

३) तुला शक्तिपलीकडे तुझी परिक्षा घेऊ देणार नाही;




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता   रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



REACHING NATIONS

## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


**CHIEF EDITOR**
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran



**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858



**CORE LEADERS**
Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah



**E.mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call


**''परमेश्वर माझा मेंढपाळ आहे;**
**मला काही उणे पडणार नाही.''** (स्तोत्र : २३:१)

प्रभु मधील अति प्रियांनो,

आम्ही प्रेमळपणे तुम्हा सर्वांना आपल्या प्रभु आणि तारणाऱ्या, येशू ख्रिस्ताच्या नामात शुभेच्छा देत आहोत.

आमच्या ''त्याच्या बोलविण्याचा प्रतिध्वनी'' मासिकाद्वारे ज्या सर्वांना देवाचा आशीर्वाद प्राप्त झाला आहे, त्यांच्या बद्दल देवाला गौरवित आहोत. आमच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'यूट्युब' चॅनलच्या माध्यमातून, पहाटे पाच मिनीटांच्या दिल्या जाणाऱ्या संदेशा द्वारे तुम्ही आशीर्वादीत होत आहात असे आम्हाला कळले, त्याबद्दल आम्ही प्रभुच्या प्रभुची स्तुती करीत आहोत. तुम्हाला लाभ मिळावा यासाठी आम्हाला शक्य ते आम्ही करीत आहोत.

जस जसे दिवस सरत जात आहेत, प्रभुचे सेवा कार्य वाढत आहे. लोकांना मोठ्या प्रमाणात आशीर्वादीत होत आहेत. परंतु सुरूवातीच्या मंडळीच्या प्रेषितांना ज्या अडचणी आणि प्रयास सहन करावा लागला, तोच अनुभव आम्ही अनुभवित आहोत. आम्ही विविध सेवा कार्याद्वारे आणि शुभवर्तमाना द्वारे जस जसे सैतानाचे बाले किल्ले उध्वस्त करीत आहोत, तो क्षुब्ध होत आहे.

परंतु आम्ही नाऊमेद - निराश होत नाही. तर आम्ही पहिल्या प्रेषितांनी आणि पूर्वजांनी जी धर्मतत्वे शिकविली व प्रवचने दिले, कोणतीहि तडजोड किंवा समजोता न करता तेच करीत आहोत. आम्हा करिता प्रार्थना करा अशी विनंती करीत आहोत. आम्हाला कोणत्याहि प्रकारे आधार देण्यासाठी पुढे येण्यास तुमचे स्वागत आहे. आम्हाला तुमच्या आधाराची आणि सहभागीतेची गरज आहे.

आम्ही या महिन्यात आणि पुढील महिन्यात पुष्कळ प्रवास करणार आहोत. कृपया आमची प्रार्थनेत आठवण ठेवा. खरे ओझे घेऊन आत्म्यांकरिता सेवा करण्याचा मार्ग कठीण - खडतर असा आहे. आमच्या अनेक देवाच्या सेवकांच्या कुटुंबातील सदस्य अनेक प्रकारे आजारी आहेत. तुमच्या प्रार्थना आणि प्रेम यामुळे आम्हाला समाधान मिळते.

तुमच्या सुचना आणि पत्रांची आम्ही अपेक्षा करीत आहोत. तुमच्या करिता आम्ही प्रार्थना देखील करीत आहोत; खरेतर तुमचय सर्व प्रार्थना विनंत्या गांभिर्याने देवाकडे नेऊन प्रार्थना करीत आहोत. देवाच्या प्रेमाने आम्ही तुम्हांवर प्रिती करीत आहोत. आम्हाला नियमितपणे तुमच्या स्वेच्छा दानांद्वारे आधार देत असलेल्या तुम्हा सर्व बंधु-बहिणक्षंना देव प्रतिफळ देवो! आमेन.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**

**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : samselvaraj333@gmail.com

**आवश्यक शक्ति पुरविल त्यांतून बाहेर पडण्याचा मार्ग दाखविल, होय बाहेर मार्ग,**
**नाऊमेद होऊ नकोस; निराश होऊ नकोस;**
**तो तुला त्यागणार नाही.**

**- फादर एस्. जे. बरचमॅन**

**देव हा दैवी संदेश तुला देत आहे!**

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) ✿ BIBLECOR - Postal Courses (3 languages) ✿ Media Ministry ✿ Online Courses ✿ Theological Correspondence Courses (2 languages) ✿ Church Planting ✿ Nehemiah Bible Colleges ✿ Gospel Printing Press ✿ Great Commission Partners ✿ St. Paul's Matriculation School ✿ Crusades ✿ Community Development

मागील काही दिवसात मला निरनिराळ्या देशशतील आक्रोश करणाऱ्या लोकांना भेटण्याची संधी मिळाली. त्यांच्यात बुद्धिमान, प्रसिद्ध डॉक्टर्स, राजकारणी, उद्योजक, श्रीमंत लोक सल्ला/मार्गदर्शन करणारे, सर्व सामान्य आणि मध्यमवर्गीय, कमी शिक्षण घेतले, देवाचे भय मानणारे आणि देवाला न मानणारे, विद्यार्थी, प्रवासी, यात्रेकरी, व्यापारी, कलाकार, लेखक, स्वत:स विश्वासणारे म्हणणारे आणि देवाचे सेवक असे सर्व प्रकारचे लोक होते. मला त्यांच्यात कोणत्या ना कोणत्या प्रकारे विविध प्रकारच्या अडचणी किंवा धडपड दिसून आल्या. त्यामुळे लोक वेगवेगळ्या ठिकाणी यात्रा करुन देवाला शोधण्याचा प्रयत्स करतात.

काही भक्तगण काही वेळा त्यांना माहिती नसलेल्या गोष्टी करतात. काहीजण देवस्थानी पोहोचण्याच्या अगोदर स्वत:स शिक्षा करुन घेऊन यात्रेची तयारी करीतात; परंतु त्याच्या यात्रेस सुरुवात करण्या अगोदर, आम्ही त्यांच्यासाठी करावी म्हणून आमच्याकडे येतात. मी त्याला महत्त्व देत नाही किंवा त्याचा उपहास देखील करीत नाही. त्यांच्या अशाप्रकारच्या वर्तनात आपल्याला एक पोकळी आणि उत्कट इच्छा दिसून येत नाही कां? चांगल्या लोकांकरिता त्यांच्या खऱ्या अर्थाने मुक्ततेकरिता त्यांची प्रथा आणि संस्कृति आड येते.

**अडचणींनी आणि त्रासाने भरलेल्या या जगात, असे अगदी थोडके लोक आहेत जे देवराज्या विषयी आणि त्याच्या वाढीविषयी विचार करितात, स्वत:स या जगाच्या सवयी आणि लोकांच्या चाली रिती पासून दूर ठेवून त्यांची पवित्रता राखून शांति आणि सुखात जीवन जगतात. या ामगचे काय कारण असू शकते? ते म्हणजे प्रभू येशू ख्रिस्ताचें सामर्थ्य जे सर्व सामान्य जनांच्या जीवनात देखील कार्य करते. हा अनुभवच सर्वांनाच आलेला असावा.**


प्रभु येशू ख्रिस्ताचे पुनरुत्थानाचे सामर्थ्य जेव्हा एखाद्या व्यक्तिच्या जीवनात येते, तेव्हा ती व्यक्ति कितीहि निरुपयोगी असली, तरी ती अतिशय उपयुक्त अशी बनते. त्याचप्रमाणे जुनाट आजार असलेल्या व्यक्तिमध्ये कार्य करितो तेव्हा त्याचा आजार पळून जातो! येशूने म्हटले, **"...जो मजवर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल."** (योहान ११:२५) एकाद्या व्यक्तिच्या शरिराचा एकादा अवयव कार्य करित नसेल आणि जी व्यक्ति येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे असा विश्वास ठेवून पश्चाताप करिते, तर त्याला दैवि आरोग्यदान प्राप्त होते आणि सर्व सामान्य व्यक्तिसारखा बनतो.

## लाजार आणि येशू ख्रिस्त !

लाजार, येशू ख्रिस्ताचा एक मित्र मृत्यु पावला. परंतु प्रभु येशू ख्रिस्तानें लाजाराला मेलेल्यांतून जीवंत केले. पुढे वृद्ध झाल्यामुळे तो मृत्यु पावला असेल. परंतु प्रभु येशू ख्रिस्त जो क्रुसावर मृत्यु पावला, तो तिसऱ्या दिवशी जीवित झाला आणि पुन: मृत्यु पावला नाही! स्वत:ला देवाचा अवतार म्हणविणारे लोक मृत्यु पावतात. ज्या कबरेत त्याने शरिर पुरण्यात येते ती नेहमीच बंद असते. परंतु केवळ येशू ख्रिस्ताची कबर आज देखील खुली आहे आणि हे ऐतिहासीक रित्या सिद्ध झालेले आहे.

रोमी सरकारने आणि मंदिराच्या अधिकाऱ्यांनी येशू च्या कबरे भोवती सुरक्षा रक्षक तैनात केले होते. पवित्र शास्त्र असे म्हणजे, **"मग पहारा बरोबर घेऊन ते गेले आणि त्यांनी धोंडीवर शिक्का मारुन कबरेचा बंदोबस्त केला."** (मत्तय २७:६६). परंतु प्रभु येशू ख्रिस्त तिसऱ्या दिवशी जीवित झाला (मत्तय २८:१-८).

मग्दालीया मरीया व दुसरी मरीया या



**Statement about ownership and other particulars about the Newspaper Echo of His Call (Marathi) - Form IV (See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | **New No. 8 & 10, Old No. 18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai - 600 005.** |
| 2. Periodicity | : | **Monthly** |
| 3. Printer, Editor, Owner & Publisher | : | **S. Sam Selva Raj** (Same Address) |
| 4. Nationality | : | **Indian** |

I, **S. Sam Selva Raj** hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

March 2023 **S. Sam Selva Raj.**

शब्बाच्या शेवटि आठवड्याच्या पहिल्या दिवशी कबर पाहावयास आल्या. जरी प्रभु येशू ख्रिस्तानें त्यांच्या शिष्यांना तो तिसऱ्या दिवशी जीवंत होणार हे अगोदरच सांगितले होते आणि जे साडेतीन वर्षे त्याजबरोबर सेवा करीत होते ते सर्वजण त्यांच्या घरात होते. प्रभुवरील त्यांचे खरे प्रेम व्यक्त करण्यात ते अपयशी ठरले. याविषयी पुढे कदाचित त्यांना खेद आणि दु:ख वाटले असते, परंतु येशूने त्यांचा हा कमकुवतपणा मनावर लावून घेतला नाही; तर तो त्यांना प्रकट झाला, त्यांचे सांत्वन केले; त्यांना सामर्थ्यशाली प्रेषितात बददले आणि त्यांचे दु:ख आनंदात बदलले.

प्रिय मित्रा, तूं जरी वेगवेगळ्या प्रसंगी आणि वेगवेगळ्या मार्गांनी प्रभु येशूच्या प्रेमाचा अनुभव घेतला; तरी तुझ्या छोट्या शंका; इच्छा आणि शरिराची लालसा यांनी तुला त्याच्या पासून दूर केले नाही कां? नाऊमेद होऊ नकोस, आपला कमीपणा कबुल कर आणि येशूकडे पुन्हा: परत फिर, **तुझ्या दु:खाचा आनंद होईल!**

## देवाच्या लेकरांना चेतावणी !

मी तुम्हाला प्रभुमध्ये विसावा पावलेले माझे पास्टर जी. सुंदरम् यांनी मंडळीला त्यांच्या समवेत सहभागितेत राहून, प्रभुच्या आनंद कसा प्राप्त करून घेता येईल याविषयी सांगितलेले नियम सांगतो -

देवाचा कोणताहि सेवक किंवा सुवार्तिक, जो जगातिल कोणत्याही भागात प्रभुच्या सेवेकरीता जावो. त्याने आपल्या कंबरे भोवती कमरबंध बांधुन त्याचे दुसरे टोक देवाने त्याला दिलेल्या मंडळीला बांधलेले असावे. जर रविवारी सेवा करण्याची जबाबदारी नसेल, तर देवाने दिलेल्या मंडळीत उपासनेत सहभागी होऊन इतरांसमवेत देवाची स्तुती करून वचन ग्रहण करावे आणि त्याचे पालन करावे.

दुसरी, आपणा सर्वच जणांची पापिष्ट विचार, पापी सवयी, वाईट संगती या सर्वांतून त्याच्या कृपेद्वारे सुटका झालेली आहे. परंतु आपण सावध राहून पुन्हा: त्या सर्व गोष्टिंकडे फिरू नये. त्या आपल्यावर हल्ला करण्याची शक्यता आहे. सावध रहा!

उदा. प्रभु येशू ख्रिस्ताच्या कृपेद्वारे जर तुमची एखाद्या सवयीतून सुटका झाली असेल, तर तुम्ही त्या सुटकेचे परिश्रमपूर्वक रक्षण करावे. त्या जागी पैसे सुटे करण्याच्या निमित्ताने जाऊ नये. त्याच प्रमाणे तुम्ही तुमच्या जुन्या वाईट मित्रांची मैत्रीतून



पूर्णपणे मुक्त व्हावे आणि पुन्हा: ती जोडू नये. तुम्ही तुमच्या निर्णयावर ठाम असाल



तर तुम्ही विजयी व्हाल आणि तुम्हाला पूर्ण आनंद प्राप्त होईल.

## मरीया मग्दालीया आणि दुसरी मरीया!

मरीया मग्दालीया जी सात दुष्टात्म्यांनी पीडीत होती, तिला येशूऊने मुक्त केले. ती दुसऱ्या मरीयेला सोबत घेऊन येशूचे शरिर ज्या कबरेत ठेविले ती कबर पहावयास गेली. तेव्हा पाहा, मोठा भूमिकंप झाला कारण प्रभूच्या दूतानें स्वर्गातून उतरुन येऊन धोंड एकीकडे लोटली आणि तीवर तो

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यम: हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल

डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

योग्यता 10 वी या अधिक

जल्दी करें!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ मार्च २०२३ ते १८ एप्रिल २०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## स्तुति करिता मुद्दे

**१९ मार्च** : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **थियॉलॉजीकल अभ्यासक्रम** बद्दल.

**२० मार्च** : १६-०१-२०२३ रोजी मंडळीच्या कार्यकर्त्यांची सभा आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२१ मार्च** : **एको ऑफ हिज कॉल** यू ट्युब चॅनल साठी नवीन वर्गणीद्वार देऊन आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२२ मार्च** : आमच्या सर्व कर्मचारी वर्गाला आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२३ मार्च** : सर्व पंथातील तरुण आणि लेकरांमध्ये घडणाऱ्या संजीवना बद्दल.

**२४ मार्च** : दुर्गम भागात देवाच्या सेवा कार्यात व्यस्त असलेल्या सर्व मिशनरी आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल.

**२५ मार्च** : देवाने आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांची भारतातील विविध ठीकाणांना आणि परदेशातील भेटी यशस्वी केल्या बद्दल.

**२६ मार्च** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, विश्वासातील भागीदार, वर्गणीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबियां करिता.

**२७ मार्च** : १९६९ सालापासूनच्या आमच्या मासिक सेवेतील जबाबदारी आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२८ मार्च** : आमच्या कार्यक्षम कारागीरांद्वारे शुभवर्तमान मुद्रणालय सतत कार्यरत सुरू असल्या बद्दल.

**२९ मार्च** : आमच्या सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियांबद्दल.

**३० मार्च** : मिशनरी सेवकांना आर्थिक आणि प्रार्थनेचे पाठबळ पुरविता आल्याबद्दल.

**३१ मार्च** : जगभरात बायबल आणि ख्रिस्ती साहित्य छापण्यास सहभागी असलेल्या व्यक्तिंच्या सर्व गरजा पुरविण्यात येत असल्या बद्दल.

**०१ एप्रिल** : स्वत:च्या वैयक्तिक गरजा असताना देखील आमच्या सेवाकार्याकरिता मदतीचा आधार देणारे भागीदार देऊन आशीर्वादीत करीत असल्या बद्दल.

**०२ एप्रिल** : आमचे वरिष्ठ पाळक, एस्. सॅम सेल्वा राज यांचे आणि त्यांच्या कुटुंबियांना उत्तम आरोग्य पुरविल्याबद्दल आणि रक्षण करीत असल्या बद्दल.

**०३ एप्रिल** : मिशनऱ्यांनी ख्रिस्ती तत्वांवर आधारीत शाळा सुरू करुन जगाला आशीर्वादीत दिल्या बद्दल.

## प्रार्थने करीता मुद्दे

**०४ एप्रिल** : जागतिक मंडळ्यांमध्ये संजीवन घडावे याकरिता.

**०५ एप्रिल** : नैसर्गिक आपत्तिपासून रक्षण व्हावे याकरिता.

**०६ एप्रिल** : एको ऑफ हिज कॉलच्या मुख्य आणि सर्व शाखा मंडळ्यांतील विश्वासी जन आणि त्यांच्या कौटुंबिक कल्याणा करिता.

**०७ एप्रिल** : मुख्य आणि सर्व शाखा मंडळ्यांतील उत्तम शुक्रवार आणि पुनरुत्थान दिनाच्या उपासना करीता.

**०८ एप्रिल** : **नहेम्या बायबल कॉलेज** चे सर्व निवासी आणि सायंकालीन विद्यार्थी शिस्तबद्ध आणि समर्पित असावेत.

**०९ एप्रिल** : लेकरांचे आणि तरुणांचे गुंगी आणणाऱ्या औषधांच्या सेवनापासून रक्षण व्हावे.

**१० एप्रिल** : जगभरात सर्वत्र उद्धवत असलेल्या वाईट सवयींपासून लेकरांचे आणि तरुणांचे रक्षण व्हावे.

**११ एप्रिल** : **सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन स्कुल**च्या १०वी च्या शासकीय परिक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांच्या यशा करिता.

**१२ एप्रिल** : जगभरातून लहान मुलांचा दुरुपयोग करण्यासाठी होत असलेला व्यापार संपुष्टात यावा.

**१३ एप्रिल** : २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरिता **सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन स्कूल** करीता नवीन विद्यार्थी मिळावेत.

**१४ एप्रिल** : ३ जून २०२३ रोजी होणाऱ्या **नहेम्या बायबल कॉलेज**च्या दिक्षांत सभे करीता.

**१५ एप्रिल** : या महिन्यातील सेवा कार्यातील सर्व आर्थिक गरजा पुरविल्या जाव्यात.

**१६ एप्रिल** : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षा करीता निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेज** साठी पात्र आणि समर्पित विद्यार्थी मिळावेत.

**१७ एप्रिल** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांना बहुविविध सेवा कार्या करीता नवीन दर्शन प्राप्त व्हावे.

**१८ एप्रिल** : जगातील सर्व राष्ट्र प्रमुख, पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि लोकसभा सदस्यां करीता.

(पान ४ वरुन)

बसला. (मत्तय २८:२)

प्रिय बंधु, बहिण, कदाचीत तुझ्या जीवनात बाजूला करता न झालेली धोंड - अडखळण असेल. तरी भिऊ नकोस, देव जेथे मार्ग नाही तेथे मार्ग तयार करील. ती वेळ कदाचीत दूर असेल. तुझे रक्षण करण्यास देव त्याचे देवदूत पाठविल. देवदूत तुजकरीता कार्य करीत आहेत. ते तुझ्या आशीर्वादाच्या आड येत असलेल्या धोंड बाजूला सारून त्यावर बसतील. तू देवाच्या आशीर्वादाच्या उंबरठ्यावर आहेस. भक्कम राहा. लवकरच तुझे दु:ख आनंदात बदलेल!

## आपली चुकीची तत्वे !

देवाच्या लेकरांनो उत्साहित व्हा! तुमच्या मार्गातील कोणतीही अडखळणे असतील आपला प्रभु येशू ख्रिस्त ती सर्व दूर करण्यास सामर्थ्यशाली आहे. मानवी वंशाच्या आशीर्वादाची किल्ली या जगातील कोणत्याही मनुष्यांकडे नाही. ती किल्ली केवळ प्रभू येशू ख्रिस्ताकडेच आहे. तुमची सर्व दु:खे त्याजकडे सोपवून द्या. त्याज पासून तुम्ही दूर गेल्यास, अनेक दु:खे आणि संकटे येतील. तुमच्यापैकी काहीजण तुमच्या वैयक्तिक जीवनात आणि देवाच्या सेवेत पतन पावला आहात. हि अतिशय भयंकर अशी चूक आहे. देवाने तुम्हाला दारिद्र्यातून आणि खोल खड्यातून तर काढून उच्च्य स्थानी ठेविले. तुम्ही हे कसे नाकारु शकतां. तीच चूक परत न करण्यासाठी श्रम करा. पश्चाताप करा! असे कराल तर निश्चितच तुमची दु:खे आनंदात बदलतील.

## हरवलेल्याचा शोध घेणारा तो देव!

प्रभु येशू ख्रिस्त तिसऱ्या दिवशी गेलेल्यांतून पुन्हा: उठला. तरी, त्याचे शिष्य त्यांच्या मासे घडण्याच्या जुन्या



व्यवसायाकडे परत गेले. ते थोडेसे गोंधळून टाकणारे वाटते. तरी देखील देव त्याची प्रीति व्यक्त करितो. आपण अगोदर म्हटल्याप्रमाणे त्याचे शिष्य तिबिर्या समुद्रात मासे धरावयास गेले. प्रभु त्यांना भेटला आणि म्हणाला, ''मुलांनो, तुम्हांजवळ काही खावयाला आहे काय?''

त्याच्या शिष्यांनी रात्रभर श्रम केले, तरी त्यांना मासे धरता आले नाहीत.

(...पान ९ वर)


## नहेम्या बायबल सायं कॉलेज
### चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | पाळकांचे समुपदेशन | : सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| १८. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १९. | साप्ताहिक शास्त्राभ्यास | : सायंकाळी ६.३० वाजता - बुधवारी |
| २०. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २१. | शिष्यत्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २२. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २३. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २४. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २५. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २६. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २७. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २८. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २९. | सकाळचे मनन | : पहाटे ५ वाजता - दररोज |
| ३०. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३१. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला **'न्यु लाईफ फॉर यू'** या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957

CHEPAUK, CHENNAI - 600 005.

Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,

Cell : 98410 71852, 95661 31858

E.mail : biblecor@yahoo.co.in

## एको ऑफ हिज कॉल

**मासिक (विनामुल्य) मिळविण्याची उत्तम संधी**

तुम्ही तुमच्या मित्रांचे/नातेवाईकांचे पत्ते आमच्याकडे पोस्टाद्वारे, पत्राद्वारे, ई.मेल, वॉटस् ॲप किंवा फोन द्वारे पाठविल्यास, आम्ही त्यांना त्यांच्या पत्त्यावर मासिक विनामुल्य पाठवित जाऊ.

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)

(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)

# दैवी मुलाकात

## DIVINE VISITATION!

१९७१ साली देवाने त्याच्या कृपेद्वारे चेन्नाई मधील चेपॉक येथील विधर्मी लोकांबद्दल ओझे दिले. या विभागात राहणारे लोक सुस्वभावी व देवावर दृढ विश्वास असणारे असे होते. ते रात्रंदिवस श्रम करणारे असे होते. विभागाची ओळख पटण्यासारख्या अनेक गोष्टी-सिनेमागृह, क्रिकेटचा स्टेडक्षयम, पोलीस चौकी चेपॉकमध्ये आहेत. त्याचप्रमाणे जगातील दोन क्रमांकाचा सर्वात लांब पल्याचा समुद्र किनारा, कामराज रोड ज्याचे दुसरे नाव रॉयल रोड, सर्वात गर्दीचा आणि लांब पल्याचा माऊंट रोड, आता त्याला अन्ना सलाई रोड म्हणून ओळखले जाते. दीपगृह, सचिवालय, प्रसिद्ध असे एगमोर रेल्वे स्टेशन आणि सेंट्रल स्टेशन अनेक शासकीय कार्यालये, कुबम नदी, प्रसिद्ध अस अंतहे चर्च, प्रेसिडन्सी कॉलेज, अन्ना मेमोरियल इमारत इत्यादी. हा चेन्नाई (जुने मद्रास)चा महत्त्वाचा असा जुना भाग आहे. मला या विभागातील अतिशय गरीब, अतिशय श्रीमंत आणि सुशिक्षित लोकांच्या आत्मिक जीवना विषयीचे ओझे होते.

त्यामुळे मी दररोज रात्री ८ ते १० या समयात माझ्या दोन देवाच्या सहकाऱ्यांसोबत प्रार्थना करण्यास सुरुवात केली. त्यांदोघांपैकी एक बंधु. चंद्रा सिंग होते, जे सध्या पौंडचरीमध्ये उद्योजक आहेत. दुसरे बंधु आय्. मोझेस पाकीया मणी, जे सध्या चेन्नाईमध्ये प्रसिद्ध उद्योगपती आहेत. आम्ही महात्मा गांधी यांच्या पुतळ्याच्या मागे गुडघे टेकून प्रार्थना करीत होतो. आमच्या जेव्हा लक्षात आले, की लोकांना चित्रपटांनी जगामध्ये आकर्षून घेतले आहे; तेव्हा आम्ही देवाने विभागातील सर्व चित्रपट गृहे काढून टाकावीत किंवा बंद पाडावीत अशी प्रार्थना करु लागलो.

काय आश्चर्य! मी प्रामाणिकपणे जाहिर करतो! देवाने आमच्या प्रार्थनांना उत्तर दिले. पॅरागॉन थियटर, स्टार, एलबीनस्टोन, देवी, शांति, अन्ना, चित्रा अशी काही चित्रपट गृहे बंद झाली. त्यामुळे जे अनेक जण वासनेच्या आधीन असे जीवन जगत होते, चित्रपट पाहण्यास वेड लागलेली होते अशांना शुभवर्तमान जाहीर करू शकलो. अनेकजण येशू ख्रिस्ताचा स्विकार करून पवित्रतेचे जीवन जगू लागले. परंतु, या विभागात उपासना मंदिर उपलब्ध नव्हते. ख्रिस्ती विश्वासात नवीन आलेल्यांना कोठेही उपासने करीता पाठविता येत नव्हते. या विभागात प्रार्थना मंदिर सुरू करणे शक्य होणार नाही असे आम्हाला वाटत होते. १९८० साली देवाने आम्हाला 'चर्च ऑफ गॉड इन इंडिया' या मंडीचीं चेपॉकमध्ये शाखा सुरू करणे शक्य होऊ दिले. परंतु, रविवारी उपासने करीता येण्याचे धैर्य कोणालाही होत नव्हते. जवळ जवळ पांच वर्षे मी माझ्या पत्नी समवेत आणि माझ्या बाळ असलेल्या मुली सह उपासना करीत होतो. मी ॲकोडीयन वाजवून संदेश देत असे. त्याबद्दल मला पुष्कळसा विरोध झाला.

एके सकाळी ८ वाजता, मी उपासनेची जागा स्वच्छ केली कारण ती उपासना सुरू करण्याची वेळ होती. जरी मी जागा स्वछ केली, तरी कोणीही उपासनेला येणार नाही या विचाराने मनात दु:ख होते. त्यामुळे मी माझ्या खोलीत आराम करावा या विचाराने गेलो, दार बंद केले व डोळे झांकले. मी झोपू शकलो नाही. डुलकी लागली आणि स्वप्न पाहीले.

स्वप्नात मला माझे संपूर्ण घर दिव्याच्या लख्ख प्रकाशाने भरलेले दिसले. घरांत सुगंध दरवळू लागल्यासारखे जाणवले. अचानक मी उपासने करीता तयार केलेल्या जागेत एक ५० वर्षे वयाच्या व्यक्तिने प्रवेश केला. त्याने घरातील सर्व दिवे आणि पंखे सुरू केले आणि गुडघे टेकून शांतपणे प्रार्थना करु लागली. त्यानंतर मला संपूर्ण जागा लोकांनी भरली गेली आहे असे दिसले.

मी घाई-घाईत उठलो, माझ्या पत्नीला आणि मुलीला उपासनेसाठी बोलाविले. आम्ही प्रार्थनेस सुरुवात केली आणि जी व्यक्ति आमच्या अगोदर प्रार्थना करीत होती, ती नाहीशी झाल्याचे जाणवले. मी आणि पत्नीने आमच्या पापाची कबुली दिली आणि उपासना सुरू केली.



बंधु डॉ. बेविन लॉरेन्स आणी मिसेस. सेरेना बेविन

थोड्या अवधी नंतर शुभ्र कपडे परिधान केलेला एक बंधु, त्याची पत्नी आणि मुलगा आमच्या सोबत गुडघे टेकलेले दिसते. ते बंधु डॉ. बेविन लॉरेन्स होते, जे सध्या पुष्कळसे सेवाकार्य करीत आहेत आणि सेवेचे मुख्यालय कोडाईकॅनल येथे आहे. ते पेशाने वैद्यकीय डॉक्टर आणि बिषण देखील आहेत. त्यांची पत्नी सेरेना बेविन सध्या एको ऑफ हिज कॉल मासिकाच्या सहसंपादक आहेत. ती दोघे एकत्रीतपणे प्रभुची पुष्कळशी सेवा करीत आहेत.

त्या दिवसाच्या नंतर मी लोक हजर असोत किंवा नसोत माझी उपासना वेळेवर सुरू करु लागली. मी हे माझे सहकारी आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शिकविते. देव चांगला आहे.

************

....Contd. from page 6

मी असे सेवक पाहीले आहेत, जे सेवेत येतात आणि काहीतरी कारण देऊन जगीक व्यवसायाकडे परत जातात. परंतु त्यांचा शेवट अपघातात होतो. कोणीही अशी चूक करु नये.

येशूने त्यांना मासे पकडण्यासाठी काही सल्ला दिला आणि त्यांनी त्यानुसार कृति केली. तो तारणारा, येशू ख्रिस्त आहे! त्याने तुम्हाला दाने आणि देणग्या देण्यास निवडीले आणि उंचाविले. तुमच्या प्रार्थनांद्वारे किती दुष्टात्म्ये काढण्यात आले? बरे होण्याची शक्यता नसलेले अशा किती जणांना आरोग्य दान प्राप्त झाले? काही समस्या किंवा काही जगीक सुख, यामुळे तुम्ही देवाच्या प्रीतिपासून पळून गेलात?

**क्षणभर तुमच्या जीवना बद्दल विचार करा!**

तुमच्या लेकरांवर आणि इतरांवर अचानक आलेल्या समस्यांमधून देवाने तुमची कशी सुटका केली? तुम्ही आजाराने, अपयशामुळे, अडचणींनी पीडित होता, अशा प्रसंगी देवाने त्याच्या चमत्कारांद्वारे तुमची सुटका केली. याचा विचार करा? तुम्ही त्याने एकदा केलेल्या मदतीचा आनंद उपभोगला असेल, तर त्याचा अर्थ तो तुमच्या सोबत आहे आणि तुमच्या प्रति दयाळू आहे, असा होत नाही कां? कृपया त्याला दूर करू नका आणि त्याला तुमच्या जीवनात प्रथम स्थान द्या. तुमचे दु:ख आनंदात बदलेल.

आपण आपल्या दैनंदिन जीवनात अनेक वादळांचा सामना करीत असतो. त वादळे वेगवेगळ्या दिशांकडून येतात, वेगवेगळ्या लोकांकडून आणि वेगवेगळ्या वेगाने येत असतात. आमच्या समोर वादळ, वारा, चक्रीवादळ आणि हानिकारक वादळ येत असतात. आपण वादळाचे प्रकार आणि ती आपणावर आदळतात. तेव्हा आपल्या जीवनावर कशा प्रकारे लादले जातात आणि त्या सर्वांतून देवाच्या सामर्थ्याने कसे विजयी होऊ शकतो हे पाहू या.

परिस्थिती अधिक वाईट होण्या अगोदर आपण कृति केली पाहिजे परिस्थिती हाताबाहेर-आवाक्याच्या बाहेर जाण्याच्या आणि हल्ला होण्याच्यामध्ये थोडासा अवधि किंवा समय असतो. सर्व परिस्थिती आपल्या आवाक्यात-नियंत्रणात येण्याकरीता देव त्याची कृपा पुरविण्या इतका दयाळू आहे. देवाची इच्छा असते की आपण शहाणपणाने आणि परिश्रमपूर्वक ती हाताळावी. मी या परिस्थितीला जे आमच्या मनावर आघात करणारे आणि लोकांद्वारे येणाऱ्या समस्या, असे वादळ म्हणतो, वादळ उद्भवत असताना जर आपण संरक्षणात्मक उपाय केले नाहीत तर आपण कदाचित बुडून जाऊ. याच कारणामुळें आपला प्रभु येशू ख्रिस्त योहान ९:४ मधील वादळाविषयी बोलतो. प्रभुला ते उद्भवण्याच्या अगोदर त्याचे काम पूर्ण करावयाचे होते. त्याने ते केले. सैतान आपल्याला गिळावे याची वाट बघत आहे. (१ पेत्र ५:८). तुमच्या आवाहानांना देवाचा तुमच्या जीवनावर पूर्ण ताबा आहे - नियंत्रण आहे हा विचार मनात ठेवून सामोरे जा! रागावू नका, दुखीत होऊ नका. सर्व परिस्थितीत देवाची स्तुती करण्याचा प्रयत्न करा. देवाच्या अभिवचनाचा पुनरुत्थान करा. देव मजबरोबर आहे आणि मजसाठी आहे. मी सर्व परिस्थितीवर विजयी होणारा आहे. स्वर्गीय-देव तुम्हाला आशीर्वाद देवो!

************

## विशेष निवेदन

### आम्हाला मानद प्रतिनिधी हवे आहेत

आम्हाला आमच्या सिंहला, नेपाळी, ऊर्दु आणि आफ्रिकन या भाषेत प्रसिद्द करण्यात येत असलेल्या मासिकांच्या वाचकांच्या संख्येत लक्षणीय घट झालेली लक्षात आली आहे. हे कदाचीत आमच्या जुन्या मित्रांनी त्यांच्या कायमच्या निवासाच्या जागेत बदलली असल्यामुळे आम्ही त्यांना गमावले असणार. आम्ही वाचकांच्या संख्येत कशाप्रकारे वाढ करता येईल याविषयी विचार करीत आहोत.

प्रयत्नांचा एक भाग म्हणून :

१) त्यांच्या भाषेतील मासिक वाचकांची सभासद नोंदणी करण्याकरिता.

२) त्यांच्या देशातील शहरातील विभागातील वाचकांकरिता पुढाकार घेऊन मासिकाच्या अधिक प्रति छापून त्यांच्या पर्यंत वितरण करण्याकरिता.

३) मासिक वितरणात वाढ व्हावी याकरिता आम्हाला नवीन पत्ते पुरविण्याकरिता आणि त्यांच्या पर्यंत मासिकांच्या झेरॉक्स प्रति त्यांना त्यांच्या मित्रांना देण्याकरिता मानद् प्रतिनिधी तयार करण्याची विनंती करीत आहोत.

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल
### युट्युब

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपाकरुन आमच्या एको ऑफ हिज कॉल युट्युब चॅनल बघा आणि सबस्क्राईब करा. आभार

- संपादक

## OUR BANK DETAILS:

*1. Bank : State Bank of India*

Branch : Triplicane, Chennai-5
Name : S. Sam Selva Raj
A/C No. : 1023 2934 679
IFSC : SBIN 00 00 249
SWIFT CODE : SBI NIN BB 455

*2. Bank : ICICI Bank*

Branch : Anna Salai, Chennai-6
Name : Echo of His Call
A/C No. : 6038 0502 2319
IFSC : ICIC 000 6038

*3. Bank : State Bank of India*

(This Account is for Tax Exemption for Indians only )

Branch : Triplicane, Chennai-5
Name : Echo of His Call Educational Trust
A/C No. : 1023 2923 805
IFSC : SBIN 00 00 249

Google Pay: 98410 71858
PayPal : SAM SELVA RAJ

*****

E.mail : sam@echoofhiscall.org

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 13th MARCH 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers**, New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**